# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना** :- **{ प्रकल्प विभाग }** नागपूर महानगरपालिका क्षेत्रात वर्धा रोड, खापरी येथे ई – बस चार्जींग स्टेशन उभारणे आणि अनुषंगीक स्थापत्य कामे करणे या कामास पीएमई – बस सेवा योजने अंतर्गत भारत सरकार कडून मंजुरी प्राप्त आहे. मनपा अंतर्गत उपलब्ध इलेक्ट्रीकल बसेसला चार्जींग सेवा उपलब्ध होण्याचे दृष्टीने प्रस्तावित केलेली कामे करणे आवश्यक आहे. मौक्यावरील जागेच्या उपलब्धतुनुसार चार्जींग स्टेशन उभारणे व अनुषंगीक स्थापत्य कामे करणे या कामाकरीता बोलावण्यात आलेल्या निविदेतील Phoenix Engineering & MR Dhoble JV यांनी 28.28 % कमी दराच्या निविदेला मा. आयुक्त मनपा, नागपूर यांनी दि. 22/08/2024 रोजी मंजुरी प्रदान केलेली आहे.

सबब कामाकरीता Phoenix Engineering & MR Dhoble JV यांनी करावयाच्या कामाचे रु. 7,43,76,453/- (In Charging GST) राशीचा कार्यादेश निर्गमित करण्याचा प्रश्न विचारात घेण्यास्तव मा. प्रशासक यांचे मान्यतेस्तव सादर.

**टिप :**

1. प्रस्तुत कामाकरीता केंद्र शासन पुरस्कृत पीएम ई- बस सेवा योजने अंतर्गत केंद्र शासनाचे 60 % व राज्य शासनाचे 40% प्रमाणे प्रावधानात मंजुरी प्राप्त आहे.
2. सदर कामाकरिता सध्या केंद्र शासनाचे 25 % व राज्य शासनाचे 25 % प्रमाणे प्रावधान उपलब्ध आहे.
3. सदर कामाकीता मा. मुख्य अभियंता यांची रु. 8,48,36,105/- राशीला दि. 25/06/2024 रोजीची तांत्रिक मंजुरी प्राप्त आहे.
4. निस्तृत टिपणी नस्तीत संलग्न आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 995/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 27/08/2024

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, प्रकल्प विभाग, यांनी वरील प्रमाणे

प्रस्तावीत केल्यानुसार  नागपूर महानगरपालिका क्षेत्रात वर्धा रोड, खापरी येथे ई – बस चार्जींग स्टेशन उभारणे आणि अनुषंगीक स्थापत्य कामे करणे या कामास पीएमई – बस सेवा योजने अंतर्गत भारत सरकार कडून मंजुरी प्राप्त आहे. मनपा अंतर्गत उपलब्ध इलेक्ट्रीकल बसेसला चार्जींग सेवा उपलब्ध होण्याचे दृष्टीने प्रस्तावित केलेली कामे करणे आवश्यक आहे. मौक्यावरील जागेच्या उपलब्धतुनुसार चार्जींग स्टेशन उभारणे व अनुषंगीक स्थापत्य कामे करणे या कामाकरीता बोलावण्यात आलेल्या निविदेतील Phoenix Engineering & MR Dhoble JV यांनी २८.२८ % कमी दराच्या निविदेला मा. आयुक्त मनपा, नागपूर यांनी दि. २२/०८/२०२४ रोजी मंजुरी प्रदान केलेली आहे.

सबब कामाकरीता Phoenix Engineering & MR Dhoble JV यांनी करावयाच्या कामाचे रु. ७,४३,७६,४५३/- (In Charging GST) राशीचा कार्यादेश निर्गमित करण्याचा प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.